# ५. प्रसारमाध्यमे आणि इतिहास

प्रसारमाध्यमांची ओळख: प्रसारमाध्यमे म्हणजे एखादी माहिती आपण एखाद्या माध्यमाच्या साहाय्याने दूरवर पोहचवू शकतो.

**प्रसारमाध्यमांचा इतिहास :**

भारतात इंग्रज आल्यानंतर वर्तमानपत्रे सुरू झाली. त्यामुळे छापील बातम्या सगळीकडे पोहचू लागल्या. माहिती, ज्ञानाचा प्रसार होऊ लागला.

वर्तमानपत्रे : वर्तमानपत्रे स्थानिक, देशांतर्गत, जागतिक स्वरूपाच्या विविध बातम्या पुरवतात. चालू घडामोडी आपल्यापर्यंत आणतात.

वर्तमानपत्रे इतिहास: इ. स. पूर्व काळात इजिप्तमध्ये सरकारी आदेशांचे कोरीव लेख सार्वजनिक ठिकाणी लावत. रोमन साम्राज्यात सरकारी हुकूम कागदावर लिहून ते कागद प्रांतात वाटले जात. ज्युलिअर सीझरच्या काळात 'अॅक्टॉ डायर्ना' नावाची वार्तापत्रे सार्वजनिक ठिकाणी लावत. चीनमध्ये सातव्या शतकात सरकारी निवेदन सार्वजनिक ठिकाणी वाटत. इंग्लंडमध्ये लढायांची व महत्त्वाच्या घटनांची पत्रके वाटत. फिरस्ते, प्रवासी दूरदूरच्या बातम्या लोकांना सांगत.

१) बेंगॉल गॅझेट : भारतात पाहिले इंग्रजी वर्तमानपत्र २९ जानेवारी १७८० रोजी सुरू झाले. बेंगॉल गॅझेट किंवा कलकत्ता जनरल अॅडव्हर्टायझर या नावानी ते ओळखले जाई. जेम्स ऑगस्टस हिकी या आयरिश व्यक्तीने ते सुरू केले.
२) दर्पण - १८३२ मध्ये मुंबईत सुरू झाले. त्याचे संपादक होते बाळशास्त्री जांभेकर. यातून राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक इतिहास सापडतो.
३) प्रभाकर – भाऊ महाजन यांनी सुरू केले. लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांची समाज प्रबोधन करणारी शतपत्रे प्रसिद्ध झाली.
४) ज्ञानोदय - यात १८४२ मध्ये आशिया खंडाचा १८५१ मध्ये 'युरोपचा नकाशा' छापण्यात आला.

पाहिले चित्र ज्ञानोदयने छापले. 'टेलिग्राफ' सुरू झाल्याची बातमी. भारतातल्या प्रथम रेल्वेची माहिती त्यानी छापली.

वर्तमानपत्रामुळे समाजप्रबोधन झाले. उदा. 'इंदूप्रकाश पत्राने विधवा – विवाहांचा पुरस्कार केला. 'दीनबंधु' मध्ये बहुजन समाजाची परिस्थिती समजते. केसरी व मराठा १८८१ मध्ये आगरकर व टिळक यांनी ही पत्रे सुरू करून तत्कालीन, सामाजिक व राजकीय प्रश्नांना वाचा फोडली. वर्तमानपत्रांना लोकशाहीचा चवथा

स्तंभ म्हणून ओळखले जाते. नियतकालिके ठरावीक कालावधीत प्रकाशित होणारे मुद्रित साहित्य म्हणजे नियतकालिके. उदा. साप्ताहिक, पाक्षिक, मासिक

**बाळकृष्ण जांभेकर** ( दिग्दर्शन ) प्रगती १९२९ संपादक त्र्यंबक शंकर शेजवलकर. त्यांनी इतिहासशास्त्र, महाराष्ट्राचा इतिहास, सामाजिक चळवळी. इ. विषयावर लेखन केले.

**वेब पत्रकारिता** – वेब पत्रकारिता प्रकारात प्रसिद्ध होणाऱ्या नियत कालिकांमध्ये इतिहास हा प्रधान्याचा विषय असतो. यू – ट्यूब सोशल मिडिया इ . वर इंग्रजी व भारतीय भाषांमध्ये मजकूर असतो .

**आकाशवाणी १९२४ मध्ये इंडियन ब्रॉडकास्टिंग** कंपनी या नावाने दरवर्षी कार्यक्रमाचे प्रसारण करणारे एक खाजगी रेडिओ केंद्र सुरू झाले. ९ जून १९३६ या कंपनीचे नामकरण 'ऑल इंडिया रेडिओ' असे झाले. सुरुवातीला शासकीय कार्यक्रम व आकाशवाणी उपक्रमाची माहिती त्यातून मिळे. ख्यातनाम ' पंडित नरेंद्र शर्मा' हे नाव यांनी दिले. आलिकडे खाजगी रेडिओ सेवा सुरू झाली आहे.

**दूरदर्शन** – महाराष्ट्रात १ मे १९७२ रोजी मुंबई केंद्राचे कार्यक्रम सुरू झाले. १९९१मध्ये परदेशी व देशी खाजगी वाहिन्यांना केबल तंत्रा द्वारे कार्यक्रम प्रसारित करण्याची परवानगी दिली. जवळजवळ 100 हून अधिक वाहिन्या कार्यक्रम प्रसारित करतात .

**प्रसारमाध्यमांची आवश्यकता :**

समाजात माहिती पसरवण्यासाठी प्रसार माध्यमांची आवश्यकता असते. अग्रलेख, बातम्या, वाचकांचा पत्रव्यवहार, वाचकांचे मार्गदर्शन यामुळे लोकशाही सदृढ होते. अशाप्रकारे वर्तमानपत्रे काम करतात. दूरदर्शन दृकश्राव्य माध्यम असल्याने प्रसिद्ध झाले. प्रत्यक्ष काय घडते हे त्यामुळे त्वरित समजते.

प्रसार माध्यमांद्वारे मिळणाऱ्या माहितीचे चिकित्सक आकलन: या माहितीची करावी चिकित्सालागते. कारण ती वास्तवाला धरून असेलच असे नाही, ती तपासून घ्यावी लागते.

**संबंधित व्यवसायिक क्षेत्रे:** वर्तमानपत्रांना त्याच्या बातम्या पोहचविताना बातमी मागची बातमी सांगवी लागते. त्यामुळे त्यांना इतिहासाची गरज पडते. एखादी बातमी भूतकाळात तशीच घडली असेल तर ते पाहावे लागते. वर्तमानपत्राच्या साहाय्याने भूतकाळातील सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि ऐतिहासिक घटना समजतात. भूतकाळाच्या पार्श्वभूमीवर वर्तमान कळण्यास मदत होते.

आकाशवाणीत सुद्धा इतिहास महत्त्वाचा विषय असतो. काही विशेष कार्यक्रमा प्रसंगी इतिहासाची गरज असते. घटनांची माहिती आणि भाषणे इत्यादीसाठी इतिहासाचा आधार घ्यावा लागतो. दूरदर्शन व इतिहास यांचे जवळचे नाते आहे. ऐतिहासिक मालिकांची निर्मिती करताना इतिहासाचा सूक्ष्म अभ्यास करावा लागतो. नॅशनल जिओग्राफी, डिस्कव्हरी इत्यादीतून जगाला इतिहास आणि भूगोल घरबसल्या समजतो.

दूरदर्शनवरून प्रसारित होण्याऱ्या इतिहासाच्या सखोल अभ्यासाची गरज असते.